कोर्ट विद्य. श्री राजू रणविर तहसिलदार काटोल यांचे कार्यालय

रा.मा.क्र. /एम.आर.सी–८१/२०२४–२५
मौजा– माळेगाव, प.ह.न. ५६,

वाचा :– १) महाराष्ट्र प्राधिकरण व नगररचना अधिनियम १९६६
२) मा.जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक २३३/एनएपी–३४/मौजा माळेगाव काटोल/२०२१–२२ दिनांक १३/६/२०२२ जा.क्र.प्रस्तु/जिल्हाधिकारी/कावि–९९६/२०२२
३) अर्जदार श्री ब्रिजमोहन तिवारी, राहणार नागपूर यांचा अर्ज

नाहरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, संदर्भीय क्रमांक ०१ मधील आदेशातील मौजा माळेगाव येथील सर्वे क्रमांक २०६/१ या वर्णनीचे जमीन रा.मा.क्र. २३३,एन.ए.पी.३४/२०२१–२२ अन्वये आदेश दिनांक १३/६/२०२२ सर्व प्रकारची मंजूरी व त्याच प्रमाणे सहायक संचालक, नगर योजना नागपूर यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक संसनाग/४२८ अन्वये आदेश दिनांक १६/२/२०२२ नुसार मंजूर करून घेतलेल्या आहेत. अर्जदार यांनी लेआउटवर सगळा प्रकारची सुविधा उपलब्ध करून दिलेबाबत NOC मिळण्याबाबतचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. प्रकरणामध्ये तलाठी मौजा माळेगाव व सचिव ग्रामपंचायत माळेगाव यांचा अहवाल मागविण्यात आला.

याअनुषंगाने दिनांक ११/१०/२०२३ रोजी अहवाल प्राप्त झालेला असून, त्यानुसार मौजा माळेगाव येथील सर्वे क्रमांक २०६/१ रा.मा.क्र. २३३,एन.ए.पी.३४/२०२१–२२ दिनांक १६/६/२०२२ ला मंजूर करण्यात आला असून, मौका चौकशी अंती असे दिसून येते की, सदरचा ले–आउटचा ला तारेचे कंपाऊंड करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे ले–आऊट मध्ये मुरूम टाकून रस्ता तयार केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे पाण्याकरीता ग्रा.पं. कार्यालय माळेगाव येथे यांनी अर्ज सादर केल्याचे पत्र मौक्यावर दाखविले. तसेच बोरवेल चे खोदकाम चालू असल्याचे दिसून येते व विद्युतची सुविधा यांचा ले–आऊट च्या क्षेत्रामध्ये विद्युत पुरवठा लाईन असल्याचे दिसून येते. व त्याच प्रमाणे वृक्षारोपन सुद्दा करण्यात आलेले आहे.

प्रकरणामध्ये दिनांक ११/७/२०२४ रोजी सचिव ग्रामपंचायत माळेगाव यांचा अहवाल प्राप्त झालेला असून, मौजा माळेगाव येथे ब्रिजमोहन किशन तिवारी, नागपूर प.ह.न. ५६ येथील सर्वे क्रमांक २०६/१ आराजी ३.७० हे.आर नाईल इस्टेट वेली नावाचे ले–ऑउट असून, ले–आउट मध्ये मुरूम रोड बनलेला आहे. त्या ले–आउटच्या ओपन स्पेसला तसेच पूर्ण ले–ऑउटला तार कंपाऊंड करण्यात आलेले आहे. वृक्षारोपन करण्यात आले असल्याबाबत अहवालामध्ये नमूद केलेले आहे.

सबब, नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत आहे.

दिनांक :– २२/०४/२०२५

TAHSILDAR KATOL

तहसिलदार, काटोल
Signed by
Raju Kacharu Ranvir
Date: 22-04-2025 17:52:20
तहसिलदार
काटोल